नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०८/२०२५ ( गुरूवार )**

---

## अवैधरित्या विनापरवाना शस्त्र बाळगणाऱ्या आणि डिझेलचा साठा करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद ,स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पो.स्टे. बोरी :— दिनांक १३/०८/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पोलीस स्टेशन बुटीबोरी हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गोपनिय माहीती मिळाली की, बुटीबोरी येथील रेल्वे स्टेशन जवळ राहणार इसम नामे गनी खान याने त्याच्या घरी मोठया प्रमाणात अवैधरित्या शस्त्रसाठा करून ठेवला आहे. अशी माहीती प्राप्त होताच नमुद पथक प्रभाग क्रं ५, बुटीबोरी येथील रेल्वे स्टेशन जवळ घटनास्थळी पोहचले. पंचासमक्ष आरोपी यास विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव गनी मोहम्मद हनिफ खान, वय ३९ वर्षे सांगितले. पोलीसांनी नमुद आरोपीच्या घराची झडती घेतली असता आरोपीचे घरात एका निळया रंगाच्या ड्रम मध्ये एक धारदार लोखंडी तलवार, एक लोखंडी मयानमध्ये ठेवलेली लोखंडी दुधारी गुप्ती, एक धारदार लोखंडी चाकु अशी मिळुन आल्याने आरोपीला शस्त्र बाळगण्याच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे कडे कोणताही परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली. सदर घटनास्थळावर घरझडती दरम्यान प्लास्टिकच्या तीन संशयीत कॅन दिसुन आल्याने सदर कॅन ची तपासणी केली असता त्यामध्ये डिझेल साठवुन ठेवलेले दिसले. डिझेल चे बिल /परवाना बाबत विचारणा केली असता त्याचे कडे कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नव्हती. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १) एक धारदार लोखंडी तलवार, २) एक लोखंडी मयानमध्ये ठेवलेली लोखंडी दुधारी गुप्ती, ३) एक धारदार लोखंडी चाकु किंमती

२,४०० /— रूपये आणि ४) ७० लिटर डिझेल किंमती ६३००/— रूपये असा एकुण ८,७००/— रूपयांचा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

**नमुद आरोपीविरूध्द पोस्टे बुटीबोरी येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सह कलम ३,७ जिवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ सहकलम ८(१) पेट्रोलीयम अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**



## सावनेर येथील बाईक रॅलीबबत...

**पो.स्टे. सावनेर** :— दिनांक १३/०८/२०२५ रोजी स्वंतत्र दिनानिमित्य सावनेर शहरात तिरंगा बाईक रॅली आयोजीत केली होती. सदर बाईक रॅलीमध्ये अग्निशमन दलाचे शासकीय मोटर सायकल मा. आमदार श्री आशिष देशमुख हे चालवित होते तसेच त्यांच्या बाईकवर पाठीमागे अग्निशमन दलाचे अधिकारी श्री निखीलेख वाडेकर हे बसले होते. त्यावेळी मा. आमदार श्री आशिष देशमुख हे विनाहेलमेट मोटर सायकल चालवित असतांनाचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व प्रसारमाध्यमांवर दिसुन आल्याने परीस्थितींची सत्यता बघता सावनेर पोलीसांनी मा. आमदार श्री आशिष देशमुख यांचेवर दिनांक १३/०८/२०२५ रोजी संध्याकाळी मोटर वाहन कायद्यान्वये कारवाई केलेली आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील श्रेणी पोलीस उपनिरीक्षक रमेश नत्थुजी ताजने यांना गुणवत्तापूर्व सेवा पदक जाहीर

श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री रमेश नत्थुजी ताजने यांची आजपर्यंत एकूण ३५ वर्षाची सेवा झालेली आहे. त्यांनी पोलीस स्टेशन कामठी, मौदा, देवलापार, बुट्टीबोरी, हायवे ट्राफिक, नरखेड ,जिल्हा विशेष शाखा, स्थानिक गुन्हे शाखा, वाहतूक शाखा, पोलिस स्टेशन खापा येथे कर्तव्य बजावले आहे. त्यांनी अनेक तपास करून गुन्ह्यांचे महत्त्वपूर्ण तपास उघडकीस आणल्या बाबत सन २००६ मध्ये मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे सन्मान चिन्ह व प्रशस्ती पत्राने गौरविण्यात आले. त्यांनी केलेल्या विविध तपासामध्ये दोषसिध्दी झालेली आहे. आजपर्यंत चांगल्या कामगिरी बद्दल ४२८ बक्षिसे मिळाले आहे. श्री रमेश ताजने सध्या पोलीस स्टेशन कुही येथे नेमणुकीस असून पोलीस खात्यात दिलेल्या गुणवत्तापूर्वक सेवेसाठी माननीय राष्ट्रपती, भारत सरकार यांच्या कडून त्यांना गुणवत्तापूर्व सेवा पदक जाहीर झाले आहे.



## .दिनांक १०/०८/२५ रोजी मोरफाटा येथे झालेल्या अपघातात दोषी वाहन निष्पन्न चालकाचा शोध कामी पोलीस पथक परराज्यात रवाना

दिनांक १०/०८/२०२५ रोजी अमित भुरा यादव, वय ३५ वर्ष, रा.लोणारा, पोस्ट गुमती, जिल्हा नागपूर हा त्याची पत्नी नामे ग्यारसी अमित यादव, वय ३० वर्ष हीचे सह मोटर सायकल जात असतांना देवलापार हद्दीतील मोरफाटा दर्गाह शिवारात झालेल्या अपघातात ग्यारसी अमित यादव या अपघातात मयत झाल्या. फिर्यादी नामे अमित भुरा यादव याचे बयाणा वरून पोस्टे देवलापार येथे दि. ११/०८/२०२५ रोजी अपराध क्रमांक ३५४/२०२५ कलम २८१, १०६ (१) भा.न्या.स अधिनियम २०२३ सहकलम १८४, १३४(ब) मोटर वाहन अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपासात फिर्यादी याने अपघात करून पळालेल्या वाहनाच्या वर्णनाचे,तसेच तांत्रीक पुरावे, प्रत्येक्ष दर्शी साक्षदार इत्यादीचा आधारावर अपघात करणारे वाहन त्याचा क्रमांकासह

निष्पन्न झाल्याने सदर वाहन व त्याचा चालक यांना वरील गुन्हयाचे तपासकामी ताब्यात घेणे करिता देवलापार पोलीसांचे पथक परराज्यात रवाना झाले आहे.

## पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत दाखल कोळसा चोरीच्या गुन्हयाबाबत...

दि. १४/०८/२०२५ चे एका वृत्तपत्रात कोर्ट की आदेश की धज्जीयां, कोयले में बडा खेल, कारवाई में बरामद कोयला गायब अशा मथळाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. परंतु दिनांक १७/०६/२०२५ रोजी मिळालेल्या गोपनीय बातमीप्रमाणे पोलीस स्टेशन कन्हान येथील गुन्हे शोध  पथक यांनी टेकाडी पुलीयाजवळ एन.एस. कोल टालवर रेड केली. कामठी ओ.सी. एम. चे सुरक्षा प्रभारी श्री संतोष यादव यांना रेडबाबत माहीती देवून घटनास्थळी पाचारण केले. घटनास्थळी अंदाजे ३० टन कोळसा मिळालेबाबत कामठी ओ.सी.एम चे सुरक्षा प्रभारी श्री संतोष यादव यांचे तक्रारीवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे दिनांक १७/०६/२०२५ रोजी अपराध कमांक ४४४/२५ कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा नोंदवीण्यात आला. कार्यवाहीमध्ये जप्ती केलेला अंदाजे ३० टन कोळसा पोलीसांनी घटनास्थळीच कामठी ओसीएम चे सुरक्षा प्रभारी श्री संतोष यादव यांचे ताब्यात दिले. त्यांनी जप्त कोळसा गाडीमध्ये भरून डब्लू. सी.एल. चे डेपो मध्ये नेवून वजन काटा केला. डब्लू.सी.एल. चे काटापावती उपलब्ध अभिलेखाप्रमाणे प्रत्यक्ष कोळशा १३ टन व गाडीसह वजन २५ टन असल्याचे दिसून आले. मा. न्यायालयाद्वारे ३० टन कोळशा अर्जदारांस देणेबाबत आदेशीत केले आहे. प्रत्यक्षात सदर कार्यवाहीमध्ये १३ टन कोळशा जप्त केला आहे. याबाबत मा. न्यायालयास माहीती देण्यात आली आहे. सदर प्रकरणी प्रशासनाकडून कोळशासंबधी कोणतीही अनियमीतता अथवा अफरातफर झालेली नाही.

# मंदीरातील दानपेटी फोडुन चोरी करणाऱ्या आरोपीस मा. कोर्टातुन शिक्षा

**पोलीस स्टेशन बेला** :—दिनांक ०९/०४/२०२५रोजी पोलीस स्टेशन बेला येथे फिर्यादी नामे श्रीकांत नंदकिशोर मुंजे, वय ४४ वर्ष, व्यवसाय रंगनाथ बाबा मंदीर देवस्थान, सिर्सी मंदीर चे सचिव पदावर कार्यरत, रा. सिर्सी वॉर्ड क्र ०४ , ता.उमरेड यांनी फिर्याद दिली की, दिनांक ०८.०४.२०२५ रोंजी रंगनाथ बाबा मंदीर देवस्थान सिर्सी येथील सप्ताहाचा हिशोब करून रात्री १०/३० वाजता फिर्यादी मंदीर बंद करून दिनांक .०९/०४/२०२५ रोजी सकाळी ०६/०० वाजता मंदीर उघडण्यासाठी आले असता मंदीरचे मेन गेट गेटला लागुन असलेला लोखंडी कुलुप तोडुन मंदीरचे समोर ठेवलेली लोखंडी दानपेटी वर लावलेला कुलप तोडुन अंदाजे २,०००/—रूपये नगदी कोणीतरी अज्ञात ईसमानी चोरून नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून अज्ञात आरोपी विरूध्द अपराध क्रंमाक अप क्र. १६०/२५ कलम ३०५(ड), ३३१(४), भा.न्या.सं कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.**बेला पोलीसांनी तांत्रिक पुराव्यावरून अज्ञात आरोपीचा शोध घेवुन आरोपी नामे सुनील श्रीकृष्ण घरत , वय २८ वर्षे रा. पिराया ता.भिवापूर जिल्हा नागपुर या आरोपीस निष्पन्न करून त्याला सदर गुन्हयात अटक केली होती.**

श्री संतोष चव्हाण , पोलीस उपनिरीक्षक, नेम पोलीस स्टेशन बेला यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक १३/०८/२०२५ रोजी मा. प्रथमवर्ग न्यायधीश श्री आर.आर मानकर यांनी नमुद नामे **नामे सुनील श्रीकृष्ण घरत ,वय २८ वर्षे रा. पिराया ता.भिवापूर जिल्हा नागपुर यास कलम ३७१ भा.न्या.सं मध्ये ५ महीने सश्रम कारावास व २०० /— रूपये अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने सरकारी अभियोक्ता श्री जयदेव बोरकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस हवलदार राजु राठोड ब. नं. २०८५ पो.स्टे. बेला यांनी मदत केली आहे

## नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे स्वतंत्रदिनानिमित्य अमली पदार्थ विरोधी अभियानांतर्गत शाळा /कॉलेज मधील विदयार्थ्यांमध्ये करण्यात आली जनजागृती

**दिनांक १४/०८/२०२५ रोजी स्वतंत्रदिनानिमित्याने अमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियाना अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात खालील प्रमाणे शाळा/कॉलेज येथे जावुन अंमली पदार्थ सेवनाच्या हानीकारक परिणामांबद्दल जागरूकता व्हिडिओ दाखवून जगजागृती करून विशेष कार्यक्रम राबविण्यात आले आहे.**

**पोलीस स्टेशन बेला :—** आज दिनांक १४.०८.२०२५ रोजी पोलीस स्टेशन बेला हद्दीतील लोकजिवन विद्यालय बेला येथे श्री. दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उपविभाग नागपुर यांचे उपस्थितीत अंमली पदार्थ विरोधी अभियाना अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमात श्री. दिपक अग्रवाल यांनी शाळेत इयत्ता ८ वी ते १२ वीच्या विदयार्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम, शिक्षणात होणारे नुकसान यावर मार्गदर्शन केले. अंमली पदार्थ सेवनाच्या हानिकारक परिणामांबद्दल जागरूकता व्हिडिओ दाखवण्यात आले आणि त्यांच्या शंका दूर करण्यात आल्या.**त्यांनी अंमली पदार्थ मुक्त भारत निर्माण करण्याची प्रतिज्ञा घेतली.** तसेच अंमली पदार्थाचे सेवन व होणारे दुषपरिणाम यावर निंबध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असुन १७ ऑगस्टपर्यंत त्यांचे निबंध सादर करण्यास सांगण्यात आले आहे आणि त्यानुसार त्यांना बक्षिसे दिली जातील.






**पोलीस स्टेशन बुटीबोरी :—** पोलीस निरीक्षक श्री प्रतापराव भोसले , प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बुटीबोरी यांनी बुटीबोरी हद्दीतील सरस्वती किसान विद्यालय व जुनिअर कॉलेज बुटीबोरी येथे अमली पदार्थ विरोधी अभियानांतर्गत कार्यक्रम घेवुन विदयार्थ्यांना अंमली पदार्थ सेवनाच्या हानीकारक परिणामांबाबत मार्गदर्शन मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली.

**पोलीस स्टेशन काटोल :-** श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी , काटोल उपविभाग आणि पोलीस निरीक्षक श्री रंजीत सिरसाठ , प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन काटोल यांच्या उपस्थितीतीत काटोल येथील नबीरा कॉलेज येथे अमली पदार्थ विरोधी अभियानांतर्गत **"अंमली पदार्थ सेवानाचे दुष्परीणाम"** या विषयावर विदयांर्थ्यांसाठी निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.




**पोलीस स्टेशन नरखेड :- नरखेड पोलीस स्टेशन तर्फे इंदीरा गांधी महाविदयालय, नरखेड येथे "अंमली पदार्थ सेवानाचे दुष्परीणाम"या विषयावर निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विदयांर्थ्यांना बक्षीस वितरण सुध्दा करण्यात आले.**

**पोलीस स्टेशन जलालखेडा :- जलालखेडा पोलीसांनी जिवन विकास विदयालय, देवग्राम येथील विदयांर्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम, शिक्षणात होणारे नुकसान यावर मार्गदर्शन केले. जलालखेडा पोलीस स्टेशन तर्फे जिवन विकास विदयालय, देवग्राम येथे "अंमली पदार्थ सेवानाचे दुष्परीणाम" या विषयावर निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.**




**पोलीस स्टेशन मौदा** :— पोलीस निरीक्षक श्री सारीन दुर्गे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा आणि मौदा येथील अधिकारी आणि अंमलदार यांनी मौदा हद्दीतील ऑक्सफोर्ड इंग्लीश स्कुल, मौदा आणि शिर्डी साई विदयालय, मौदा येथे अमली पदार्थ विरोधी अभियानांतर्गत कार्यक्रम घेवुन विदयार्थ्यांना अंमली पदार्थ सेवनाच्या हानीकारक परिणामांबाबत मार्गदर्शन मार्गदर्शन मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली. तसेच **“अंमली पदार्थ सेवानाचे दुष्परीणाम” या विषयावर निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. उत्कुष्ट निबंध लिहणाऱ्या विदयार्थ्यांना दिनांक १५/०८/२०२५ रोजी बक्षीस वितरीत केल्या जाईल.**




पोलीस स्टेशन कन्हान :— **पोलीस निरीक्षक श्रीमती वैजंयती मंडवधरे , प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कन्हान यांनी कन्हान अंतर्गत ग्रामीण विकास विदयालय व कनिष्ठ महाविदयालय,सालवा, कन्हान येथील विदयार्थ्यांना** अंमली पदार्थ सेवनाच्या हानिकारक परिणामांबद्दल जागरूकता व्हिडिओ दाखवुन जनजागृती करण्यात आली.

पोलीस स्टेशन खापरखेडा :— **खापरखेडा पोलीसांनी महाराष्ट्र विदयालय, खापरखेडा येथील विदयांर्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम, शिक्षणात होणारे नुकसान यावर मार्गदर्शन केले. तसेच** अंमली पदार्थ सेवनाच्या हानिकारक परिणामांबद्दल जागरूकता रॅली काढण्यात आली



**पोलीस स्टेशन उमरेड :— उमरेड पोलीसांनी आदर्श विदयालय उमरेड येथील विदयांर्थ्यांसोबत संवाद साधुन त्यांना अमली पदार्थाच्या व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम, शिक्षणात होणारे नुकसान यावर मार्गदर्शन केले.**

**पोलीस स्टेशन कुही :— पोलीस निरीक्षक श्री प्रशांत काळे , प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कुही यांनी ऋखखड माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय, कुही येथील विदयार्थ्यांना** अंमली पदार्थ सेवनाच्या हानिकारक परिणामांबद्दल **मार्गदर्शन केले.**




**पोलीस स्टेशन वेलतुर :—** सहा .पोलीस निरीक्षक श्री प्रशांत मिसाळे , प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन वेलतुर यांनी स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविदयालय, वेलतुर आणि विश्वव्यापी माध्यमिक विदयालय वेलतुर येथील विदयार्थ्यांना अंमली पदार्थ सेवनाच्या हानिकारक परिणामांबद्दल मार्गदर्शन केले.




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने